**प्रस्तावना:-**

**विषय:-.प्रभाग समिती क्र.५च्या कार्यक्षेत्रातील सुंदरबेनी पेट्रोलपंप कल्याणनाका येथे सी.सी.गटर(लहान नाला) बनविणेबाबत.**

प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील सुंदरबेनी पेट्रोलपंप कल्याणनाका येथे सी. सी. गटर (लहान नाला) बनविणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३५,४३,१३६/- मात्रच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो यांची मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास मा. प्रशासकीय ठराव क्रं.१६८ दिनांक १६/५/२०२३ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. ३५,४३,१३६/- ई-निविदा सुचना क्र.२०/९०७५८६ (२०२३-२४) दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.२३/०५/२०२३ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी निविदाकारांची नावे निविदेतील दर एकुण २ निविदाकार खालील प्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाकार | दर |
|---|---|---|
| **१** | **मे. झा पी अँड कं.** | **अंदाजपत्रकीय दराने** |
| २ | मे. साई कंस्ट्रक्शन,भिवंडी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.६६० टक्के जादा दराने |

वरील पैकी मे.झा पी अँड कं. यांची अंदाजपत्रकिय दराने म्हणजेच रक्कम रु.३५,४३,१३६/- (अक्षरी पस्तीस लक्ष त्रेचाळीस हजार एकशे छत्तीस मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.: - 234 दिनांक :- 98/07/2023

मे.झा पी अँड कं. यांची अंदाजपत्रकिय दराने म्हणजेच रक्कम रु. ३५,४३,१३६/- (अक्षरी पस्तीस लक्ष त्रेचाळीस हजार एकशे छत्तीस मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, प्रभाग समिती क्र.५च्या कार्यक्षेत्रातील सुंदरबेनी पेट्रोलपंप कल्याणनाका येथे सी.सी.गटर (लहान नाला) बनविणे कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.झा पी अँड कं. यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका